**नियमित दि दावा क्र.५४१/२०२३**
**भगवान वि. मारुती**

## <u>निशाणी क्र. ०१ वरील आदेश</u>

प्रस्तुत दावा वादीने दावा मिळकतीचे वाटप करुन मिळणेकामी दाखल केला आहे. वादीने दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांनी एकत्रित खरेदी घेतली असून वादी दावा मिळकतीचा सह खरेदीदार आहे असे कथन करुन दावा मिळकतीचे वाटप होवून मिळण्याची विनंती प्रस्तुत दाव्याद्वारे केली आहे. वादीने कथनापुष्टयर्थ दावा मिळकतीचे खरेदीखत (नि.क्र. २९) अभिलेखावर दाखल केले आहे. प्रतिवादीने वादीचा दावा मान्य असलेबाबत लेखी कैफियत दाखल केली आहे.

२. वादीने दाखल केलेल्या खरेदीखताचे अवलोकन केले असता, वादी व प्रतिवादी यांनी दि. २२/०६/२००६ रोजी दावा मिळकत १) श्री. राजेंद्र हरी शिंदे, २) जितेंद्र हरी शिंदे, ३) रविंद्र हरी शिंदे व ४) हरी धोंडिबा शिंदे यांचेकडून नोंदणीकृत खरेदीदस्त क्र. ३११६/२००६ अन्वये खरेदी घेतली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. हरी धोडिंबा शिंदे हे राजेंद्र, जितेंद्र व रविंद्र यांचे वडील असल्याचे दिसून येते.

३. परंतु, सदर खरेदीखतामध्ये दावा मिळकतीचा सन २००५–०६ कालावधीचा म्हणजेच खरेदीखत झाले त्यावेळेसचा सातबारा उतारा जोडलेला आहे. सदर सातबारा उता–यामध्ये खरेदी देणार जितेंद्र, रविंद्र हरी शिंदे यांचे अ.पा.क. हरी शिंदे असल्याची नोंद आहे असे दिसून येते. सदर जितेंद्र व रविंद्र हरी शिंदे यांचे वयाचा पुरावा खरेदीखताला जोडलेला नाही. सदर सातबारा उतारा नोंदीवरुन खरेदीखतावेळी सदर जितेंद्र व रविंद्र हरी शिंदे अल्पवयीन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, सदर खरेदीखतावेळी त्यांचे वडील हरी धोडिंबा शिंदे यांनी गार्डीयन आणि वार्ड ॲक्ट, १८९० मधील कलम २९ अन्वये न्यायालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक होते. सदर न्यायालयाची पुर्व परवानगीचा आदेश प्रत खरेदीखतास जोडलेला दिसून येत नाही. त्यामुळे, सदर खरेदीखतात वादी व प्रतिवादी यांनी केवळ खरेदी देणार या सदरात

सदर जितेंद्र व रविंद्र हरी शिंदे हे अल्पवयीन असताना त्यांना सज्ञान दाखवून न्यायालयाची पुर्व परवानगी न घेता सदर खरेदीखत करुन घेतले असल्याची शक्यता नाकारता येत नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते.

४. सदर खरेदीखतावेळी खरेदी देणार जितेंद्र व रविंद्र हरी शिंदे हे अल्पवयीन असतील तर आणि सदर खरेदीखत न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय झाले असेल तर सदर खरेदीखत गार्डीयन आणि वार्ड ॲक्ट कलम ३० अन्वये अवैध (voidable) आहे. त्यामुळे, सदर जितेंद्र व रविंद्र हरी शिंदे यांचे वय खरेदीखतावेळी किती होते याबाबत पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सदर दावा मिळकत फेरफार उतारा क्र. २२२९ अन्वये हरी धोंडिबा शिंदे यांनी स्वतः व जितेंद्र हरी शिंदे, रविंद्र हरी शिंदे यांच्यावतीने अ.पा.क. म्हणून दावा मिळकत खरेदी घेतली होती असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, वादीने सदर जितेंद्र हरी शिंदे व रविंद्र हरी शिंदे यांच्या वयाबाबतचा पुरावा तसेच दावा मिळकतीचा फेरफार उतारा क्र. २२२९ या नोंदीची प्रत अभिलेखावर सादर करावी.

ANAY DNYANESH KULKARNI

Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.04.21 17:44:19 +0530

दिनांक – २१/०४/२०२६

(**अनय ज्ञा. कुलकर्णी**)
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 21/04/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 21/04/2026 |